**ISSN 2349-638x**
**Impact Factor 5.707**

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No. 46

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor

Dr. T. L. Barbole
Head, Dept. of Economics

Dr. B. W. Gund
Head, Dept. of Pol. Science

Prof. N. B. Kale
Head, Dept. of Commerce

Prof. B. J. Kukade
Head, Dept. of Sociology

Jawahar Arts, Science & Commerce College,

Chief Editor
Prof. Pramod Tandale

| | | | |
|---|---|---|---|
| 53. | हरिचंद्र विष्णु केळे | भारतीय बँकीग क्षेत्रासमोरील आव्हाने आणि सुधारणा | 157 |
| 54. | प्रा. डॉ. अरुण चांगदेव खर्डे | जागतिकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्था | 161 |
| 55. | प्रा.चेतना दत्तात्रय जगताप | जागतिकरणाचे औदयोगिक क्षेत्रावरील परिणाम - एक अभ्यास | 164 |
| 56. | डॉ.सांगळे सुधाकर अच्युतराव | जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम | 168 |
| **POLITICAL SCIENCE** | | | |
| 57. | प्रा. व्ही.डी. आचार्य | जागतिकीकरण आणि भारताचे परराष्ट्र धोरण | 174 |
| 58. | प्रा. अजय श्रीधर फड | जागतिकीकरण आणि भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | 177 |
| 59. | प्रदीप विनायक चौधरी | भारतातील पक्षपध्दतीतील बदल | 179 |
| 60. | डॉ.बी.डब्लू. गुंड | भारतीय लोकशाही समोरील साम्प्रदायिकतेची समस्या | 183 |
| 61. | प्रा. आबासाहेब बब्रुवान गायकवाड<br>श्री गोंविद भैरवनाथ दोरगे | भारतीय राजकरणातील वाढती घराणेशाही | 185 |
| 62. | प्रा.डॉ. सायबण्णा घोडके | जागतिकीकरण आणि भारताचे पराराष्ट्रधोरण | 187 |
| 63. | बालासाहेब बाबुराव घुगे | जागतिकीकरण आणि भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | 189 |
| 64. | गोविंद मधुकर खाडप | भारताचे परराष्ट्र धोरण : अलिप्ततावादी धोरणाचे बदलते आयाम | 191 |
| 65. | संजय दगडू क्षीरसागर | भारतातील पक्षपध्दतीतील बदल | 193 |
| 66. | डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर | आघाड्यांच्या राजकारणातील प्रादेशिक पक्षांची भूमिका | 196 |
| 67. | प्रा.डॉ. महेश नारायण मोटे | आघाड्यांच्या राजकारणातील प्रादेशिक पक्षांची भूमिका | 199 |
| 68. | प्रा. लक्ष्मण मारोती घोटेकर | जागतिकीकरणाचे तिसऱ्या जगावरील परिणाम | 202 |
| 69. | प्रा.संजय मोहाडे<br>डॉ.सुनिल शिंदे | आघाड्यांच्या राजकारणातील शिवसेनेची विरोधी पक्ष म्हणून भूमिका | 204 |
| 70. | प्रा.संजय मोहाडे | भारताचे परराष्ट्र धोरण | 206 |
| 71. | डॉ.संतोष कोल्हे | भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील आव्हाणे | 208 |
| 72. | प्रा.डॉ. नामानंद गौतम साठे | जागतिकीकरण आणि भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | 210 |
| 73. | प्रा. सिध्देश्वर चंद्रकांत सुरवसे | जागतीकीकरणानंतर भारतातील लोकशाही वाटचालीतील आव्हाने | 213 |


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

# जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम

डॉ.सांगळे सुधाकर अच्युतराव
जवाहर महाविद्यालय, अणदूर
ता.तुळजापूर,जि. उस्मानाबाद

**०.१) प्रस्तावना : -**

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात जागतिक अर्थव्यवस्थे मध्ये काही मोठे बदल घडून आले.साधारणत: १९८५ नंतर वेगाणे घडून आलेल्या त्या बदलांना जागतिकीकरण असे नाव मिळाले व त्या मुळे बहुतेक सर्व देशाच्या अर्थव्यवस्था प्रभावित झाल्या. जगातील विविध राष्ट्रीय अर्थव्यवस्थांना परस्पर जोडणारी, त्यांच्यामध्ये वस्तू व सेवा,भांडवल, तंत्रज्ञान, श्रम, याचा मुक्त प्रवाह सुरू होण्याची रचना म्हणजे जागतिकीकरण.

अॅडम स्मिथ यांच्या काळांपासून मुक्त व्यापाराला तथाकथीत लाभांचा जो हिरिरीने पुरस्कार केला जात होता, त्याचेच सुधारीत व आधुनिक रूप म्हणजे जागतिकीकरण होय. मुक्त व्यापाराच्या पुरस्कारा मागे तत्कालीन वास्तववादी राष्ट्रांचा स्वार्थ होता. आजच्या जागतिकीकरणामागे निवडक विकसीत देशांचे आर्थिक हितसंबंध आहेत. याचा फायदा होण्यासाठी, आंतराष्ट्रीय व्यापारात वाढ व्हावी म्हणून १९४८ मध्ये ' गॅट ' या संघटनेचे रूपांतर १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटनेत केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर आर्थिक व्यवहार भुसुलभ व्हावेत म्हणून रूगवे येथील चर्चेनंतर १९९४ मध्ये ' General Agreement on Tarrits and trade ' या करारावरती ११८ सदस्य राष्ट्रांनी सह्या केल्या. पुढे आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ व्हावी म्हणून १९४७ मध्ये २३ राष्ट्रांनी ' गॅट ' करारावर सह्या केल्या. पण सर्व देशामध्ये व्यापारा विषयी एकमत झाले नव्हते. अनेक मुद्यावर मतभेद होते होते. परंतू शेवटचे गॅटचे तत्कालीन महासंचालक आर्थर डंकेल यांनी विस्तारीत प्रस्ताव तयार केला व त्यावर १९९४ मध्ये ११८ देशांनी सह्या केल्यावर आंतरराष्ट्रीय कायद्यात रूपांतर झाले.

१९९१ मध्ये परकीय चलनाची टंचाई निर्माण झाली. परंतू चलण टंचाई हा एकमेव प्रश्न भारतीय अर्थव्यवस्थेसमोर नव्हता तर त्याच बरोबर बेकारी , भाववाढ, वाढत्या तेलाच्या किंमती परकीय चलणाचा तुटवटा, विदेशी गुंतवणूक कमी इ. प्रश्न अर्थव्यवस्थेचे समोर आ वासून उभे होते. अर्थव्यवस्थेला या बिकट स्थितीतून बाहे काढण्यासाठी बरेच बदल करणे गरजेचे होते. त्या वेळचे तात्कालीन पंतप्रधान व अर्थमंत्री नविन आद्योगिक धोरण जाहीर केले ते म्हणजे (खाऊजा) खाजगीकरण, उदारीकरण,जागतिकीकरण या धोरणाचा स्विकार केला.

**०.२) उद्देश -**

१) जागतिकिकरणामुळे शेतीवर झालेलल्या परिणामाचा अभ्यास करणे.
२) भारतीय शेतीसमोर असणा-या आडचणींचा अभ्यास करणे.
३) जागतिकीकरणानंतर कृषी मालाच्या आयात-निर्यातीची स्थिती अजमावणे.

**०.३) संशोधन पध्दती : -**

प्रस्तूत शोध निबंधात दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. मासिके, दैनिक, जर्मल,वेबासाईट, वार्षिक अहवाल पुस्तके इ. दुय्यम साधनाच्या सहाय्याने माहिती गोळा करण्यात आलेली आहे.

**०.४) जागतिकी करणाची संकल्पना : -**

जागतिकीकरण ही अत्यंत व मानवी जीवनाचा विविध संबंधीत असणारी अशी प्रक्रिया आहे. ज्या मुळे जागतिकी करणाचा अर्थ स्पष्ट करणे सोपे नाही. वेगवेगळया अभ्यासकांनी जागतिकी करणाची संकल्पना घेण्यासाठी काही वेगवेगळया अभ्यासकांनी, वेगवेगळया दृष्टीकोणातून व्याख्या संकलित केल्या आहेत.

१) "जागतिकीकरण म्हणजे वस्तू व सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाह आतिजलद व प्रसारण जपणारे तंत्रज्ञान याचे वाढते प्रमाण तसेच विविधता यांच्या सहाय्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परालंबित्व होय " आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी (IMF)
२)" जागतिकीकरण म्हणजे उपभोग्य वस्तूच्या समावेशासह सर्ववस्तूवरील आयात नियंत्रणे हळूहळू रद्द करणे. आयात जकातीचे दर कमी करणे. सार्वजनिक क्षेत्रावरील उपक्रमाचे खाजगीकरण करणे होय ." जागतिक बँक
३) "एखाद्या राष्ट्राचे आर्थीक व्यवहार त्याच्या भोगोलिक व राजकीय सीमेच्या बाहेर विस्तारीत करण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय " दिपक नय्यर

**०.५) कृषी उत्पादन : -** भारतीय कृषी क्षेत्रातील उत्पादकता पुढील प्रमाणे सांगता येईल.निवडक पिकाचे उत्पादकता पुढे तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce Co
Andur Tal. T...

तक्ता क्र. १

**भारतातील निवडक पिकांची उत्पादकता (दशलक्ष टन )**

| अ.क्र. | वर्ष | अन्नधान्य | दाळी | तेलबिया | कापूस | ताग | ऊस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९५०-५१ | ५०.८२ | ८.४१ | ५.१६ | ३.०४ | ३.३१ | ५७.०५ |
| २ | १९६०-६१ | ८२.०२ | १२.७ | ६.९८ | ५.६ | ५.२६ | ११० |
| ३ | १९७०-७१ | १०८.४२ | ११.८२ | ९.६३ | ४.७६ | ६.१९ | १२६.६७ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १९८०-८१ | १२९.५९ | १०.६३ | ९.३७ | ७.०१ | ८.९६ | २५४.२५ |
| ५ | १९९०-९१ | १७६.३९ | १४.२६ | १८.६१ | ९.८४ | ९.२३ | २४१.०५ |
| ६ | २०००-०१ | १९६.८१ | ११.८ | १८.४४ | ९.५२ | १०.५६ | २०५.९६ |
| ७ | २०१०-११ | २४४.४९ | १८.२४ | ३२.४८ | ३३ | १०.६२ | ३४२.४८ |
| ८ | २०११-१२ | २५९.२९ | १७.१ | २९.८ | ३५.२ | ११.४ | ३६२.०४ |
| ९ | २०१२-१३ | २५७.१३ | १८.३४ | ३०.९४ | ३४.२२ | १०.९३ | ३४१.२ |
| १० | २०१३-१४ | २६५.०४ | १९.२५ | ३२.७५ | ३५.९ | ११.६८ | ३५२.९४ |
| ११ | २०१४-१५ | २५२.०२ | १७.७५ | २७.५१ | ३४.८ | ११.१३ | ३६२.३३ |
| १२ | २०१५-१६ | २५१.५७ | १६.३५ | २५.२५ | ३०.०१ | १०.५२ | ३८८.४५ |
| १३ | २०१६-१७ | २७५.६८ | २२.९५ | ३२.१ | ३३.०९ | १०.६ | ३०६.७२ |
| | | २५५९.२७ | २००.४ | २७९.०२ | २७५.९९ | ११९.५९ | ३३९९.३४ |

**Source agricultural outlook and station Analysis report (N.C.E.R.)**

वरिल तक्ता क्र.१ वरूण असे निदर्शनास येते की सन १९५०-५१ ते २०१६-१७ या कालखंडात प्रमुख पिकांच्या उत्पादकतेमध्ये संथ व स्थिर गतिणे वाढ होतान दिसते. जागतिकीकरणानंतर भारतीय शेतीतील निवडक अन्नधान्याच्या पीकाचा विचार केल्यास १९५०-५१ मध्ये केवळ ५०-५२ दशलक्ष टण येवढं उत्पादन दिसून येते तर पुढे २०१६-१७ मध्ये २५७-६८ द.ल.टन येवढे होऊन त्यामध्ये सतत वाढत गेलेले आहे

दाळीच्या उत्पादनात देखील १९५० मध्ये ८.४१ द.ल.टन होते. १९९०-१९९३ मध्ये २२.९५ ४ लक्ष टन येवढी वाढ झालेली दिसते. २०१६-१७ मध्ये सर्व पिकाच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येते. तेलबीया ५.१६ वरूण ३२.१ द.श.ल.क्ष टनापर्यंत वाढ झालेली दिसते कापूस पीकाच्या उत्पादनात देखील १९५०-३.०४ दशलक्ष टनावरूण वाढ होऊन १९१६-१७ मध्ये ३३.०९ द.ल.टनापर्यंत वाढ झालेली आहे. ऊस पिकाची स्थिती देखील १९५० मध्ये

५७.५ द.श.ल.क्ष टनावरून सन २०१६-१७ मध्ये ३०६ द.श.ल.क्ष टनापर्यंत वाढ झालेली दिसते . अन्नधान्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झलेली दिसून येते. तरी देखील अन्नधान्य उत्पादन वाढीचा सरासरी दर मात्र घटत गेलेला दिसून येतो. जागतिकीकरणानंतर ह्या दरामध्ये सातत्याने घट झाल्याचे दिसते. म्हणजेच जागतिकीकरणांतर एकूण उत्पादनात वाढ होत गेली असली तरी सरासरी वृध्दी दरात मात्र सातत्याने घट झाल्याचे दिसून येते. सातत्याने असे राहिल्यास पीक रचनेत बदलाची आवश्यकता आहे.

**तक्ता क्र.२**

**(लाख / लख मेट्रीक टन / लाख हेक्टर)**

| अ.क्र. | वर्ष | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
|---|---|---|---|---|
| १ | २००७-०८ | २०.२ | २११ | १०.४५ |
| २ | २००८-०९ | २०.५ | २१४.४ | १०.४६ |
| ३ | २००९-१० | २०.८ | २२३.२ | १०.७३ |
| ४ | २०१०-११ | २१.८ | २४०.४ | ११.३ |
| ५ | २०१-१२ | २३.२ | २५७.३ | ११.९ |
| ६ | २०१२-१३ | २३.७ | २६८.८ | ११.३४ |
| ७ | २०१३-१४ | २४.५ | २८०.८ | ११.४६ |
| ८ | २०१४-१५ | २३.२ | २७७.७ | ११.९६ |
| ९ | २०१५-१६ | २५.५ | २८६.२ | ११.६८ |
| १० | २०१६-१७ | २४.८ | ३००.६ | १२.१ |
| ११ | २०१७-१८ | २४.९ | ३०५.४ | १२.३ |

**Source Department of agriculture corporation and farmer welfare**

वरिल तक्ता क्र.२ असे दिसून येते की. एकुण जमिनीपैकी शेती क्षेत्रासाठी वापरण्यात येणा-या २००७ ते २०१८ या ११ वर्षाच्या कालखंडात ४ ७ द.ल. हेक्टरने वाढ झालेली दिसून येत आहे. सरासरी उत्पादनात २६०.५२ लाख मेट्रीक टन एवढी वाढ झालेली आहे. उत्पादन व उत्पादकतेत सरासरी वाढ कमी प्रमाणात ८ झाल्याचे दिसून येते.

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

**तक्ता क्र. ३**

**कृषि क्षेत्रात रासायनिक खताचा वापर**

**(लाख टन )**

| अ.क्र. | वर्ष | युरिया | डीएपी | एमओपी | कॉम्प्लेक्स | नायट्रोजन N | फॉस्फेट P | पोटॅश K | एकूण N+P+K |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००१-०२ | १९९.१७ | ६१.८१ | १९.९३ | ४९.६३ | ११३.१ | ४३.८२ | १६.६७ | १७३.६ |
| २ | २००२-०३ | १८४.९३ | ५४.७३ | १९.१२ | ४८.१ | १०४.७४ | ४०.१९ | १६.०१ | १६०.९४ |
| ३ | २००३-०४ | १९७.६७ | ५६.२४ | १८.४१ | ४७.५७ | ११०.७७ | ४१.२४ | १५.९८ | १६७.९९ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २००४-०५ | २०६.६५ | ६५.५६ | २४.०६ | ५५.०८ | ११७.३३ | ४६.२४ | २०.६१ | १८३.९८ |
| ५ | २००५-०६ | २२२.९७ | ६७.६४ | २७.३१ | ६६.९४ | १२७.२३ | ५२.०४ | २४.१३ | २०३.४ |
| ६ | २००६-०७ | २४३.३७ | ७३.८३ | २५.८६ | ६७.९९ | १३७.७३ | ५५.४३ | ३३.३५ | २१६.५१ |
| ७ | २००७-०८ | २५९.६३ | ९४.५७ | २८.८८ | ५७.७ | १४४.१९ | ५५.१५ | २६०३६ | २५५.७ |
| ८ | २००८-०९ | २६६.४९ | ९२.३१ | ४०.७८ | ६८.५ | १५०.९ | ६५.०६ | ३३.१३ | २४९.९ |
| ९ | २००९-१० | २६६.७४ | १०४.९२ | ४६.३४ | ८०.२५ | १५५.८ | ७२.७४ | ३६.३२ | २६४.८६ |
| १० | २०१०-११ | २८१.१२ | १०८.७ | ३९.३१ | ५७.६४ | १६५.५८ | ८०.५ | ३५.१४ | २८१.२३ |
| ११ | २०११-१२ | २९५.६४ | १०१.९१ | ३०.२९ | १०३.९५ | १७३ | ७९.१४ | २५.७५ | २७७.९ |
| १२ | २०१२-१३ | ३००.०२ | ९१.५४ | २२.२१ | ७५.२७ | १६८.२१ | ६६.५३ | २०.६२ | २५५.३६ |
| १३ | २०१३-१४ | ३०६ | ७३.५७ | २२.८ | ७२.६४ | १६७.५ | ५६.३३ | २०.९९ | २४४.८२ |
| १४ | २०१४-१५ | ३०६.१ | ७६.२६ | २८.५३ | ८२.७८ | १६९.४६ | ६०.९८ | २५.३२ | २५५.७६ |
| १५ | २०१५-१६ | ३०६.३५ | ९१.०७ | २४.७६ | ८८.२१ | १७३.७२ | ६९.७९ | २४.०२ | २७७ ५३ |
| १६ | २०१६-१७ | २९६.१४ | ८९.६४ | २८.६३ | ८४.१४ | १६७.३५ | ६७.०५ | २५.०८ | २५९.४९ |

**Source :- Directorate of Economics and statistics, DAC & few .**

वरिल तक्ता क्रं.३ वरून असे निदर्शनास येते की, जागतिकीकरणा नंतर भारतीय शेती मध्ये रासायनिक खताचा वापर वाढत गेल्याचे दिसून येते. युरिया खताचा वापर २००१ मध्ये १९९.१७ लाख टन येवढा होता .२०१६-१७ मध्ये ३०६ टनायेवढी वाढ झालेली दिसून येते. डीयेपी खताचा देखील तसाच वापर वाढत गेल्याचे दिसून येते. २००१-०२ मध्ये लखटन येवढा वापर वाढलेला आहे

नायट्रोजन फॉस्फेट पोटॅशियम याचा देखील शेती मध्ये वापर वाएत असलेला दिसून येत आहे.सन २००१-०२ मध्ये १७३.६ लाख टनावरून येवढा वापर २०१६-१७ मध्ये २५९.४९ लाख टन येवढा झाल्याचे दिसून येत आहे. जागतिकीकरण नंतर भारतीय शेती मध्ये रासायनिक खताचा वापर वाढत गेलेला आहे.

**तक्ता क्र. ४**

**जागतिकीकरणा नंतर कृषिक्षेत्रातील निर्यात**

**(करोड रू)**

| अ.क्र. | वर्ष | कृषि र्यिात | एकूण र्यिात | टक्केवारीत र्यिात | एकूण र्यिात |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1990-91 | 6012.76 | 32527.3 | 18.49 | |
| 2 | 1991-92 | 7838.04 | 44041.8 | 17.8 | |
| 3 | 1992-93 | 9040.3 | 53668.3 | 16.84 | |
| 4 | 1993-94 | 12586.55 | 69748.9 | 18.05 | |
| 5 | 1994-95 | 13222.76 | 82673.4 | 15.99 | **180/10=18.01%** |
| 6 | 1995-96 | 20397.74 | 106353 | 19.18 | |
| 7 | 1996-97 | 24161.29 | 118817 | 20.33 | |
| 8 | 1997-98 | 24832.45 | 130101 | 19.09 | |
| 9 | 1998-99 | 25510.64 | 139752 | 18.25 | |
| 10 | 1999-2000 | 25313.66 | 159095 | 15.99 | |
| 11 | 2000-01 | 28657.37 | 201356 | 14.23 | |
| 12 | 2001-02 | 29728.61 | 209018 | 14.22 | |
| 13 | 2002-03 | 34653.94 | 255137 | 13.98 | |
| 14 | 2003-04 | 36415.48 | 293367 | 12.41 | |
| 15 | 2004-05 | 41602.65 | 375340 | 11.08 | **117/10=11.72%** |
| 16 | 2005-06 | 45310.97 | 456418 | 10.02 | |
| 17 | 2006-07 | 57767.87 | 571779 | 10.1 | |
| 18 | 2007-08 | 74673.48 | 656864 | 11.39 | |
| 19 | 2008-09 | 81064.52 | 840755 | 9.64 | |

Principal, Jawahar Arts, Science & Commerce College, Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 20 | 2009-10 | 84443.95 | 845554 | 9.99 | |
| 21 | 2010-11 | 113406.58 | 1136964 | 9.94 | 75/6=12.6 % |
| 22 | 2011-12 | 182801 | 1465959 | 12.47 | |
| 23 | 2012-13 | 227192.61 | 1634318 | 13.9 | |
| 24 | 2013-14 | 262778.54 | 1905011 | 13.79 | |
| 25 | 2014-15 | 239681.04 | 1896445 | 12.64 | |
| 26 | 2015-16 | 215395.68 | 1716378 | 12.55 | |

source: Directorate General Intelligence % Statistics Department of Commerce

वरिल टेबल क्र.४ वरून असे निदर्शनास येते की, कृषी वस्तूची निर्यात सन १९९०-९१ मध्ये ६०१२.७६ करोड रूपयांची होती. १० वर्षानंतर २००० मध्ये २५३.६६करोड रूपयाची झाली. म्हणजे १८.०१ % येवढीच निर्यात दिसून येते. पुढे २००० ते २०१० या १० वर्षांच्या काळात ११.२ % निर्यात झाली म्हणजे या काळात आयातीत घट झाल्याचे दिसून येते. सन २०११ ते २०१६ या ६ वर्षांच्या काळात १२ % निर्यात झाल्याची दिसून येते. निर्यातीमध्ये अल्पशी वाढ झालेली दिसून येते.

**तक्ता क्र.५**

**जागतिकीकरणांतर कृषिक्षेत्रातील आयात**

**(करोड रू)**

| अ.क्र. | वर्ष | कृषि आयात | एकूण आयात | टक्केवारीत आयात | एकूण आयात |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 1990-91 | 1205.86 | 43170.8 | 2.79 | 55.16/10=5.11 % |
| 2 | 1991-92 | 1478.27 | 47850.8 | 3.09 | |
| 3 | 1992-93 | 2876.25 | 63374.5 | 4.54 | |
| 4 | 1993-94 | 2327.3 | 73101 | 3.18 | |
| 5 | 1994-95 | 5937.21 | 89970.7 | 6.6 | |
| 6 | 1995-96 | 5890.1 | 122678 | 4.8 | |
| 7 | 1996-97 | 6612.6 | 138920 | 4.79 | |
| 8 | 1997-98 | 8784.19 | 154176 | 5.7 | |
| 9 | 1998-99 | 14566.48 | 178332 | 8.17 | |
| 10 | 1999-2000 | 16066.73 | 215529 | 7.45 | |
| 11 | 2000-01 | 12086.23 | 228307 | 5.29 | 42.72/10=4.27 % |
| 12 | 2001-02 | 16256.61 | 245200 | 6.63 | |
| 13 | 2002-03 | 17608.83 | 297206 | 5.92 | |
| 14 | 2003-04 | 21972.68 | 359108 | 6.12 | |
| 15 | 2004-05 | 22811.84 | 501065 | 4.5 | |
| 16 | 2005-06 | 15977.75 | 660409 | 2.42 | |
| 17 | 2006-07 | 23000.28 | 840506 | 2.74 | |
| 18 | 2007-08 | 25549.81 | 1012312 | 2.23 | |
| 19 | 2008-09 | 28719.24 | 1374436 | 2.09 | |
| 20 | 2009-10 | 54356.19 | 1363736 | 3.99 | |
| 21 | 2010-11 | 51073.97 | 1683467 | 3.03 | 22.8/6=3.8 % |
| 22 | 2011-12 | 70164.51 | 2345463 | 2.99 | |
| 23 | 2012-13 | 95718.89 | 2669162 | 3.59 | |

Principal, Jawahar Arts, Science & Commerce College, Andur Tq. Tuljapur Dist. Osmanabad

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 24 | 2013-14 | 85727.3 | 2715434 | 3.16 | |
| 25 | 2014-15 | 121319.02 | 2737087 | 4.4 | |
| 26 | 2015-16 | 140288.69 | 2490298 | 5.63 | |

source: Directorate General Intelligence % Statistics Department of Commerce

वरिल टेबल क्रं. ५ वरूण असे निदर्शनास येते की, १९९०-९१ ते १९९-२००० या दहा वर्षाच्या काळात ५.११ % आयात केलेली दिसून येते. पुढच्या १० वर्ष कालखंडात ४.२७ % एवढी आयात झाली आहे. ०.८४ एवढी घट झालेली दिसते. घट नगण्य आहे. २०१५-१६ मध्ये ५ वर्षात आणखीन कमी आयात झालेली दिसून येते. ३.८ % एवढीच आहे. आयातीत सरासरी घटीचे प्रमाण दिसून येते.

**६) जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम : -**

**अनुकूल परिणाम**

१) शेतीउत्पादनात वाढ झाल्याचे दिसून येते.
२) शेती क्षेत्रातील निर्यात वाढ झलेली दिसून येते.
३) शेती क्षेत्राच्या वृध्दी दरात वाढ
४) शेती क्षेत्रातील गुंतवणूकीत वाढ
५) रोजगाराच्या संधीत वाढ
६) अन्नधान्याच्या आयातीत घट झालेली दिसून येते.
७) जागतिकीकरणामध्ये शेती क्षेत्रातील अनुदानात कपात झालेली दिसून येते.
८) मोठया शेतक-याना फायदा झालेला दिसून येतो.

**प्रतिकूल परिणाम : -**

१) प्रगत देशातील शेतीमाला बरोबर स्पर्धेत टिकाव लागणे अवघड
२) सिमांत शेतक-याच्या अस्तित्वास धोका पोहचतो.
३) बहुराष्ट्रीय कंपण्यांची मक्तेदारी निर्माण होते.
४) शेतमाल निर्यातीत जाचक अटी व नियमाच्या समस्या सामारे जावे लागते , त्यामुळे निर्यातीमध्ये अल्प वाढ झालेली आहे.
५) आयातीत सरासरी घटीचे प्रमाण दिसून येते.
६) जागतिक करणाच्या प्रक्रियेत भारतीय शेतीच्या मुळ प्रश्नाकडे दुर्लक्ष केले असते.
७) भारतीय शेतीच्या सरासरी विकासाचा दर घट होताना दिसते
८) शेतीचा उत्पादन खर्चात वाढ झालेली दिसून येते.
९) जागतिकीकरणामुळे आदिवासींना कोणताही फायदा झाला नाही.
१०) भारतासारख्या विकसनशील देशातील शेतीला देण्यात येणारी अनुदाने विकसीत देशाच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे भारतीय शेतकरी स्पर्धेत बाहेर केला जात आहे.

**७) सारांश :-**

जागतिकव्यापार संघटनेचे सदस्य स्विकारल्या नंतर भारतीय शेतीचा व शेतक-यांचा विकास होईल, आंतरराष्ट्रीय बाजारात कृषीमालाच्या किंमती वाढतील, शेतमालाच्या किंमती वाढल्यास शेतक-याला ज्यास्त नफा / फायदा मिळेल पण या उलटच चित्र समोर येऊ लागले.जागतिक व्यापारात फारशी वाढ झाली नाही. पेटंट कायदा भारतीय शेतीच्या दृष्टीने बराच जाचक ठरला आहे. या पेटंट मुहे बहुराष्ट्रीय कंपण्याची व विकसीत देशांची

मक्तेदारी दिसून येते. बहुराष्ट्रीय कंपन्याना त्याचे पेटंट मिळाल्याने बी-बीयाने औषधे, रासायनिक खते यांचे प्रभुत्व दिसून येते. त्यांच्या किंमती शेतक-यांच्या आवाक्याबाहेर जातात. त्यामुळे शेती व शेतक-यांची दुरावस्था वाढलेली आहे. शेतकरी कर्जाच्या जाळयात आडकत चाललेला आहे आणि शेतीची सरासरी उत्पादकता घटत आहे. एकूण उत्पादन संत गतीने वाढत आहे. शेतमालाच्या निर्यातीची स्थिती फारशी समाधानकारक दिसून येत नाही.

**८) संदर्भ ग्रंथ**


१. कृषी अर्थशास्त्र डॉ.वसुधा पुरोहीत
२. कृषी ग्रामीण अर्थशास्त्र : विजय कविमंडल , मंगेश प्रकाशन नागपूर
३. कृषी, सहकारिता एवं किसान कल्याण विभाग
४. दत्त सुंदरम :- भारतीय अर्थव्यवस्था, दिल्ली
५. Directorate of Economics and statistics, DAC & few .
६. Annual Report १९१६ - १७ Government of India , Ministry Of Commerce & Industry Depart of Commerce
७. Pocket books of Agricultural Statistics . R.B.I Report


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

८. Dpartment of Agricultural Corporation & farmers welfare .
९. Ministry of Agriculture and Farmers Welfare. Department of Agricultural corp.-oration and Welfare Directorate of Economics and Statistics New Delhi.
१०. योजना मासीक
११. अर्थसंवाद मासीक (त्रैमासिक विविध अंक )
१२. वेगवेगळे दै.नियतकालिके


**वेबसाईट**


१) www.agricoop.nic.in
२) www.agricop.nic.in


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad